E - 7026792

सेवानिलंबन कालावधीचा निर्णय घेणेबाबत.
(श्री.सुखदेव रखमा वायाळ तत्कालीन सेवानिवृत्त ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत येळी पंचायत समिती पाथर्डी)

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

आदेश साप्रवि-२/ग्रापं-३ /९८१ /२०२५

दिनांक- स्वाक्षरी खाली नमुद केले प्रमाणे

संदर्भ :- १.आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/२२४/२०१४अ.नगर दिनांक ०९/०४/२०१४ (सेवा निलंबन आदेश)

२. आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/१५३/२०१५ अ.नगर दिनांक १६/०२/२०१५ (सेवेत पुनस्थापित केले)

३.ग.वि.अ.प.सं पाथर्डी यांचे पत्र क्रं. ग्राप/आस्था-१/१७१/२०२५ दि.०४.०३.२०२५

४.महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.डिईएन१८९५/१६५९/प्र.क्र.१२०/२०, दिनांक-२४/११/१९९५

५.महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फ व सेवेतुन काढुन टाकणे यांचे काळांतील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ७२ चे (५) (७)

६.या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.१३३१४१२, दि.१४/०६/२०२५

७.ग.वि.अ.पं.स पाथर्डी यांचे पत्र क्रं.ग्राप/आस्था-१/५२४/२०२५, दि.२४.०६.२०२५ अन्वये श्री सुखदेव रखमा वायाळ यांचा खुलासा दि.२३.०६.२०२५.

संदर्भ क्रमांक १ चे आदेशान्वये, श्री.सुखदेव रखमा वायाळ तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत वडनेर,पंचायत समिती राहुरी यांना अनाधिकृत गैरहजर/गैरवर्तनाबाबत शिक्षा अंतिम करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक ६ अन्वये श्री वायाळ तत्कालीन कार्यरत ग्रामसेवक पंचायत समिती राहुरी यांचे दिनांक ०९/०४/२०१४ ते दिनांक १६/०२/२०१५ अखेरच्या सेवानिलंबन कालावधीचा निर्णय घेणे कामी त्यांना नोटीस देण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक ७ अन्वये त्यांनी सदर प्रकरणी खुलासा सादर केला असुन, पदावर कार्यरत असताना केलेल्या गैरवर्तनाबाबत व कार्यालयीन अनाधिकृत गैरहजेरीबाबत मला देय होणा-या निवृत्ती वेतनातुन ५ % रक्कम कायमस्वरुपी कपात करण्याचा शिक्षेचा आदेश पारित करण्यात आलेला आहे. सदर कालावधी सेवेच्या सर्व कारणांसाठी कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणून ग्राहय धरण्यात यावा अशी विनंती केली आहे.

सबब,श्री.सुखदेव रखमा वायाळ तत्कालीन सेवानिवृत्त ग्रामसेवक यांचा खुलासा समर्थनिय नसल्याने अमान्य करण्यात येत असुन संदर्भ क्रमांक ५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्त सेवा निलंबन व बडतर्फ यांचे काळांतील प्रदाने) नियम १९८१ चा नियम ७२ चे (५) (७) मधील तरतूदीनुसार श्री.सुखदेव रखमा वायाळ, सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी पंचायत समिती कार्यरत तालुका पाथर्डी यांचा दिनांक ०९/०४/२०१४ ते दिनांक १६/०२/२०१५ अखेरचा सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व कारणांसाठी कामावर व्यतीत न केलेला कालावधी म्हणून समजणेत यावा.

सदर आदेशाची नोंद संबधीताचे सेवा पुस्तकात घेण्यात यावी. सदरचा आदेश जि.प.अहिल्यानगर www.nagar.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेताक २०२५०९२९०६०९३० ..........आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 29-09-2025 21:02:57
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति- श्री.सुखदेव रखमा वायाळ ,सेवानिवृत्त ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत येळी, ता.पाथर्डी
द्वारा:- गट विकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी

प्रत- गट विकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी पुढील कार्यवाहीसाठी.